क्रमांक : ८८३७/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २२ जून, २०२०

:: कार्यालयीन आदेश ::

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या मा.मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने या सचिवालयातील "ग्रंथपाल, महिती व संशोधन ग्रंथालयीन कामकाज" याकरीता एमपॅनलमेंटद्वारे (Empanelment) **श्री.बाळासाहेब बाबुराव वाघमारे यांची करार पध्दतीने या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली आहे. उक्त नियुक्ती ही** शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे या संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाचा क्रमांक :- संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांकित १७ डिसेंबर, २०१६ रोजीचा शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे. **श्री.वाघमारे यांच्या पदाचे नामाभिधान "सेवानिवृत्त ग्रंथपाल" असे राहिल.**

**श्री.बाळासाहेब बाबुराव वाघमारे, सेवानिवृत्त ग्रंथपाल यांना सदरहू नियुक्तीच्या कालावधीत खालील नमूद अटी व शर्ती लागू असतील :-**

**१) पारिश्रमिक :-**

श्री.बाळासाहेब वाघमारे यांना नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात आले आहे (श्री.वाघमारे यांचे मासिक पारिश्रमिक निश्चितीचे आदेश स्वतंत्र निर्गमित करण्यात येतील.) या प्रमाणे निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक श्री.वाघमारे यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहिल.

**२) भत्ते :-**

श्री.वाघमारे यांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५%" इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय राहिल.

**३) प्रवास व दैनिक भत्ता :-**

श्री.वाघमारे यांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल.

**४) शासकीय निवासस्थान :-**

श्री.वाघमारे हे नियुक्तीच्या वेळेस शासकीय निवासस्थानात राहत असतील तर ते शासकीय निवासस्थान शासन नियमातील अटी व शर्तींच्या अधीन राहून कायम ठेवण्यास त्यांना अनुमती देण्यात येत आहे.